# वसई-विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती (ई) नालासोपारा
### ता.वसई, जि. पालघर
दुरध्वनी क्र. (०२५०) २४०२१७९ २४०२५६३

---

जा.क्र.वविशम/साप्रवि/ १२५७ /१८-१९
दिनांक :- २५।२।२०१९

**जाहिर दरपत्रक**

याद्वारे कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील मौजे भुईगाव (बु.) विभागातील जोसोडी तलाव, भोलाव तलाव, डोंगरी मोडी तलाव, डोंगरी लहान तलाव तसेच वाघोली विभागातील सोज तलाव सन २०१९-२० व सन २०२०-२१ या दोन वर्षांकरिता मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी खालील नमुद केलेल्या निश्चित देकारावर दि. ०३/०३/२०१९ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात दरपत्रके मागविणेंत येत आहेत. सदरची दरपत्रके प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथील आवक-जावक विभागात सादर करणेंत यावीत.

| अ.क्र. | तलावाचे नाव | किमान देकार रक्कम | ठेकेदाराने भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | जोसोडी तलाव | ४५,९८०/- | |
| २. | भोलाव तलाव | १,८४,८३८/- | |
| ३. | डोंगरी मोडी तलाव | १,७१,११०/- | |
| ४. | डोंगरी लहान तलाव | ९,७७६/- | |
| ५. | सोज तलाव | ८२५०/- | |

**अटी-शर्ती**

१. दरपत्रक धारकाने दरपत्रकातील दर भरताना जी.एस.टी. करासहित दर भरावयाचे आहेत.
२. दरपत्रकधारकांचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यांत यावी.
३. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.
४. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालात उपस्थित राहून रु. १००/- चे करारपत्रावर करारनामा लिहून द्यावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यांत येईल.
५. दरपत्रकातील दर सादर करताना सर्व करासहित दर्शविण्यात यावे.
६. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार महापालिकेस राहील.
७. वरील अटींचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.
८. दरपत्रकधारकांनी वरील तलावांसाठी वेगवेगळी दरपत्रके सादर करणे बंधनकारक असेल. तलावांची एकत्रित दरपत्रके स्विकारण्यांत येतील.
९. वरील तलावांची दरपत्रके बंद लिफाफ्यात दि. ०३/०३/२०१९ रोजी दु. ३.०० वाजता प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथे सादर करावित.
१०. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ०३/०३/२०१९ रोजी संध्या ४.०० वाजता मा. सहा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यांत येतील.

प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा
वसई-विरार शहर महानगरपालिका

Scanned by CamScanner